## कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना

टोल फ्रि क्रमांक 1064

कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 04/06/2019.

**सजा घुंगर्डे हादगाव अतिरिक्त सजा साडेगाव चे तलाठी श्री.अमोल मारोती कोंकटवार यांना 10,000/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आरोपी लोकसेवक. श्री.अमोल मारोती कोंकटवार वय 25 वर्षे, व्यवसाय तलाटी. सजा घुंगर्डे हादगाव अतिरिक्त सजा साडेगाव ता. अंबड जि.जालना रा. भत्तापुर ता.देगलुर जि.नांदेड ह.मु.धाईत नगर, अंबड ता. अंबड जि.जालना. |
| 2 | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण | :- | दि.04.06.2019 रोजी तलाटी श्री. कोंकटवार यांची दैनंदिन कामकाजाची खोली. वैद्य सर यांचे रुम मध्ये टाकुर नगर, अंबड येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| 4 | सापळा अधिकारी | :- | श्री.आ.वि.काशीद , पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना. |

याबाबत थोडक्यात हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार यांचे आजोबा. आत्माराम भाऊराव सोनवने यांचे नावे ईंदलगाव शिवारात गट क्र.45मध्ये आसलेल्या वडीलोपार्जीत जमीनीचा वाटणीपत्रका आधारे फेर घेण्यासाठी त्यांच्या गावचे आगोदरचे तलाटी यांचेकडे लागणारी फेर घेण्यासाठी लागणारी कागदपत्रे तक्रारदार यांनी आगोदर दिलेली होती परंतु त्यांची बदली झाल्याने सदरची फाईल ही तलाटी श्री.कोंकटवार यांचेकडे दिली होती . त्यामुळे तक्रारदार यांनी सदरील काम झाले किंवा नाही हे पाहण्यासाठी तलाटी श्री.कोंकटवार यांना भेटून सांगितले की मी या आगोदर फेर करण्यासाठी ची फाईल आगोदरचे तलाटी यांच्याकडे दिली होती ती फाईल त्यांनी तुमच्याकडे दिल्याचे सांगितले असे तक्रारदार म्हणाले असता आलोसे.श्री. कोंकटवार, तलाटी यांनी तक्रारदार यांना तुम्हाला आजोबाच्या नावावरील जमीनीचा फेर तुझ्या वडीलाच्या व चुलतीच्या नावाने करायचा असेल तर तुम्हाला मला 10,000/- रु.द्यावे लागतील. नाहीतर तुमचा फेर होणार नाही. त्यावर तक्रारदार यांनी काही कमी जास्त करण्याची विनंती केली असता आलोसे. श्री. कोंकटवार, तलाटी यांनी तक्रारदार यांना सांगितले की 10,000/- रुपये आणुन दे फुकट काम होणार नाही असे म्हणाले तेंव्हा तक्रारदार यांची आलोसे . श्री. कोंकटवार, तलाटी यांना लाच द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे दि.29.05.2019 रोजी तक्रार नोंदवली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.29.05.2019 रोजी ला.प्र.विभागाने तलाटी . श्री. कोंकटवार, यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी त्यांचे दैनंदिन कामकाजाची खोली. वैद्य सर यांचे रुम मध्ये टाकुर नगर, अंबड येथे केली असता पडताळणी दरम्यान तलाटी . श्री. कोंकटवार, यांनी तक्रारदार यांचे आजोबाच्या नावावरील जमीनीचा फेर त्यांच्या वडीलाच्या व चुलतीच्या नावाने करणेसाठी तक्रारदार यांचेकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन. त्यांचे दैनंदिन कामकाजाची खोली. वैद्य सर यांचे रुम मध्ये टाकुर नगर, अंबड येथे येथे स्विकारण्यास तयार झालेचे निष्पन्न झाले.

त्यावरुन आज दि.04.06.2019 रोजी आलोसे.श्री.कोंकटवार,तलाटी , सजा घुंगर्डे हादगाव अतिरिक्त सजा साडेगाव यांचे विरुध्द त्यांचे दैनंदिन कामकाजाची खोली. वैद्य सर यांचे रुम जवळ टाकुर नगर, अंबड येथे येथे लाचेचा सापळा आयोजीत केला असता आलोसे. श्री.कोंकटवार,तलाटी , सजा घुंगर्डे हादगाव अतिरिक्त सजा साडेगाव यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे वरील नमुद कामासाठी पंचासमक्ष 10,000/- रुपयाची लाच स्विकारली असातांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आलेले असुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना